अनधिकृतपणे वैद्यकिय शिक्षण देणा-या संस्थांवर कारवाई करण्याविषयी

# महाराष्ट्र शासन
## वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग

शासन परिपत्रक क्र. एमआयएस २००३ /१०८६/प्र.क्र.३५१/०३/अधिनियम
मंत्रालय, मुंबई
दि. १६ एप्रील २००४

वाचा: शासन परिपत्रक, वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, क्र. एमआयएस २००३ /१०८६/ प्र.क्र.३५१/०३/अधिनियम, दि. ७ जानेवारी २००४

परिपत्रक - शासन परिपत्रक, वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, क्र. एमआयएस २००३ /१०८६/ प्र.क्र.३५१/०३/अधिनियम, दि. ७ जानेवारी २००४ नुसार, अनधिकृत पॅथींचे वैद्यकिय शिक्षण देणा-या व अधिकृत पॅथींचेही शिक्षण देणा-या अनधिकृत संस्था / कॉलेजिस तात्काळ बंद पाडण्याविषयी व संस्थाचालकांवर कारवाई करण्याविषयी, तसेच प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हाधिका-यांनी त्यांच्या जिल्ह्यात अनधिकृत पॅथीतील शिक्षण देणारी संस्था/कॉलेज अथवा अधिकृत पॅथीतील शिक्षण देणारी अनधिकृत संस्था/कॉलेज कार्यरत रहाणार नाही, याची वेळोवेळी खातरजमा करण्याविषयी शासनाने आदेश निर्गमित केले आहेत.

२. उक्त परिपत्रकातील परिच्छेद क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे, केंद्र शासनाच्या आदेश क्र.आर.१४०५५/२५/९६-यू ॲंड एच (आर) (प्रीटी)ए, दि.२५.११.२००३ अन्वये केंद्र शासनाने ॲलोपॅथी, आयुर्वेद व सिद्ध, युनानी, व होमिओपॅथी, तसेच नॅचरोपॅथी व योग या चिकित्सापद्धतीखेरिज अन्य कोणत्याही चिकित्सापद्धतीस जसे की इलेक्ट्रोपॅथी / इलेक्ट्रो-होमिओपॅथी, ॲक्युपंक्चर, मॅग्नेटोथेरपी, रेकी, रिफ्लेक्सोलॉजी, युरिन थेरपी, ॲटोयुरिन थेरपी, हिप्नोथेरपी, अरोमोथेरपी, कलर थेरपी, प्रॅनिक हिलिंग, जेम्स ॲंड स्टोन थेरपी, म्युझिक थेरपी, इ. "अल्टरनेटीव्ह सिस्टिम ऑफ मेडिसिन" या संज्ञेखाली येणा-या विविध पॅथींना मान्यता दिलेली नाही.

३. या संदर्भात शासन असे स्पष्ट करीत आहे की, केंद्र शासनाने वर उल्लेखिलेल्या आदेशान्वये ॲक्युपंक्चर व हिप्नोथेरपी या आरोग्य विज्ञानाच्या दोन शाखांना स्वतंत्र चिकित्सा पद्धती ( Separate Systems ) म्हणून मान्यता दिली नाही, परंतु ॲक्युपंक्चर व हिप्नोथेरपी या दोन शाखांना उपचार पद्धतीचे प्रकार ( Modes of therapy) म्हणून मान्यता दिली आहे. याबाबतीत केंद्र शासनाचे असे निदेश आहेत की, या दोन शाखांमधील व्यवसाय नोंदणीकृत वैद्यक व्यवसायी अथवा योग्यप्रकारे प्रशिक्षित व्यक्ती करू शकतात, ॲक्युपंक्चर व हिप्नोथेरपी या शाखांचे अभ्यासक्रम केवळ " सर्टिफिकेट कोर्सेस " स्वरूपाचे असावेत, ते पदवी वा पदव्युत्तर पदवीचे अभ्यासक्रम (बॅचलर व मास्टरर्स डिग्री कोर्सेस) असू नयेत, ॲक्युपंक्चर व हिप्नोथेरपी चे सर्टिफिकेट कोर्सेस केवळ नोंदणीकृत वैद्यकिय व्यवसायिकांसाठीच चालविण्यांत यावेत.

३. ॲक्युपंक्चर व हिप्नोथेरपीस केंद्र शासनाने जरी Modes of therapy म्हणून मान्यता दिली असली, तरी याचा अर्थ असा नव्हे की कोणत्याही अनधिकृत संस्थेस यातील अभ्यासक्रम चालविण्याचे अधिकार आहेत. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ हा कायदा



जिल्हाधिकारी

दि.३.६.१९९८ पासून अमलात आल्यानंतर आरोग्यविज्ञानविषयक कोणतेही कोर्सेस सुरू करण्यापूर्वी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठाची व शासनाची मान्यता घेणे आवश्यक आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( जी. एस. गिल्ल )

शासनाचे प्रधान सचिव

प्रति,

- पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
- सर्व पोलिस आयुक्त / सर्व जिल्ह्याचे पोलिस अधिक्षक,
- सर्व विभागिय आयुक्त,
- सर्व जिल्ह्याचे जिल्हाधिकारी,
- प्रबंधक, महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल /महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसिन/ महाराष्ट्र होमिओपॅथी कौन्सिल/ महाराष्ट्र डेंटल कौन्सिल, मुंबई,
- कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक, यांना परिपत्रक दि. ७ जानेवारी २००४ च्या व केंद्र शासनाच्या आदेश क्र.आर.१४०१५/२५/९६-यू ॲंड एच (आर) (पीटी)ए, दि.२५.११.२००३ च्या प्रतीसह अग्रेषित. त्यांना विनंती करण्यात येते की, ॲक्युपंक्चर व हिप्नोथेरपी चे सर्टिफिकेट कोर्सेस सुरू करण्याबाबत योग्य ती पुढील कार्यवाही सत्वर करावी.
- महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई, (त्यास व्यापक प्रसिद्धि देण्याच्या विनंतीसह)
- सर्व जिल्ह्याचे जिल्हा आरोग्य अधिकारी,
- सर्व जिल्ह्याचे जिल्हा माहिती अधिकारी ,( यास व्यापक प्रसिद्धि देण्याच्या विनंतीसह)
- निवडनस्ती (अधिनियम)

## एखादी व्यक्ती कोणत्याही ग्रामीण क्षेत्रात वैद्यकीय व्यवसाय करू शकते

महाराष्ट्र शासनाचे पत्र क्रमांक : सी.आय.एम. 1088/176 एम.ई.डी.-8

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
मंत्रालय, मुंबई - 32.

दिनांक 18 मार्च 1989

महाराष्ट्र मेडिकल प्रॅक्टीशनर्स ॲक्ट 1961 च्या कलम 37(1) व (2) ची तरतूद पुढील प्रमाणे आहे..

(1) जर ग्रामीण क्षेत्रातील कोणत्याही गावात मुंबई वैद्यकीय अधिनियम 1912 अन्वये किंवा मुंबई वैद्यकीय व्यवसाय अधिनियम 1938 अन्वये किंवा कोणत्याही तत्सम विधी अन्वये किंवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या मुंबई होमिओपॅथीक अधिनियम 1951 अन्वये किंवा होमीओपॅथीक व बायोकेमीक व्यवसायींच्या पात्रता व नोंदणी संबंधीच्या कोणत्याही विधी अन्वये नोंदलेल्या व्यवसायीने ज्या तारखेस व्यवसाय त्या गावात करण्यास सुरूवात केली असेल त्या तारखेच्या पूर्वीपासून व्यवसाय करीत असेल तर आणि

(2) जो पर्यंत त्याच्या व्यवसायाचे मुख्य ठिकाण म्हणून त्या गावात व्यवसाय चालू असेल तो पर्यंत वैद्यकीय व्यवसाय करण्यास अधिकार राहील. तरी शासन आपणास आता अशा सूचना देत आहे की, यापुढे बोगस डॉक्टर्स विरूध्द महाराष्ट्र मेडिकल प्रॅक्टीशनर्स ॲक्ट 1961 व भारतीय दंड विधान मेडीकल कलमा खालील तरतुदीनुसार कारवाई करण्यापूर्वी महाराष्ट्र मेडीकल प्रॅक्टीशनर्स ॲक्ट, 1961 च्या कलम 37 (1) व (2) मधील तरतुदी लक्षात घ्याव्यात व तद्नुसार वैद्यकीय व्यावसायिकांवर अन्याय होणार नाही हे पहावे. तसेच सदर ॲक्टच्या कलम 37(1) व (2) तरतुदीनुसार जे वैद्य आपला वैद्यकीय व्यवसाय करण्यास पात्र असून सुध्दा त्यांचेवर अनवधानाने कायदेशीर कारवाई करून न्यायालयात खटले दाखल केलेले असतील तर असे खटले काढून घेण्याची प्रक्रिया सत्वर चालू करावी.

सही/- (र्श.का. होळकर) उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत : (1) वैद्यराज, गो.ज. रामय्या, मंत्री महाराष्ट्र प्रांतिय वैद्य मंडळ, मुंबई.

(2) उपसचिव, गृह विभाग, मंत्रालय मुंबई.

(3) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

तसेच सर्व जिल्हा दंडाधिकारी, सर्व पोलीस आयुक्त, सर्व पोलीस अधीक्षक यांना माहिती व योग्य त्या कारवाईसाठी सादर अग्रेषित.

(कु. गो. मगारा) कक्ष अधिकारी

अनुभवी व्यक्तींना वैद्यक व्यवसाय करता येईल -
दि इंडियन मेडीकल कौंसील ॲक्ट 1970 (48)

ज्याप्रमाणे महाराष्ट्र मेडीकल प्रॅक्टीशनर्स ॲक्ट 1961 हा आहे. त्याचप्रमाणे भारत सरकारचा इंडियन मेडीकल सेंट्रल कौन्सील ॲक्ट 1970 (48) हा आहे. त्यात सेक्शन 17 ए.क्लास 3/सी प्रमाणे 5 वर्षापेक्षा जास्त प्रॅक्टीस करण्याचा अनुभव असेल त्या वैद्यावर कारवाई होवू शकणार नाही. त्याला वैद्यकीय व्यवसाय करण्याचा अधिकार आहे असे सेक्शन सी मध्ये म्हटले आहे.

# आयुर्वेद व युनानी वैद्यांवर पोलीस कारवाईस मनाई

औरंगाबाद, १४ डिसेंबर/प्रतिनिधी

आयुर्वेद व युनानी वैद्यांवर पोलीस कारवाई करण्यास मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने मनाई केली आहे.

'इनलिस्टेड आयुर्वेदिक डॉक्टर्स असोसिएशन', जळगावचे डॉ. जयवंत शिंदे व अन्य सात डॉक्टर, उस्मानाबादची जय धन्वंतरी आयुर्वेदिक सेवा संस्था यांनी ही याचिका सादर केली आहे. आयुर्वेदिक युनानी कौन्सिल ऑफ बिहार (पाटणा) ही बिहार मेडिकल कौन्सिल कायद्याद्वारे अस्तित्वात असलेली कायदेशीर परिषद आहे. या परिषदेचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर उमेदवारास वैद्य म्हणून प्रमाणपत्र दिले जाते. वैद्य म्हणून प्रमाणपत्र प्राप्त करणाऱ्या डॉक्टरांना भारतात वैद्यकीय व्यवसाय करण्याची परवानगी महाराष्ट्र शासनाने वैद्यकीय व्यवसाय अधिनियम, १९६१ मधील कलम ३७ प्रमाणे दिली होती. मात्र हे कलम राज्य शासनाने वगळले आहे. या कलमाखाली नोंदणीकृत नसलेल्या डॉक्टरांना राज्य शासनाने व्यवसाय करण्यास प्रतिबंध केला आहे. हे कलम रद्द झाल्यामुळे वैद्य म्हणून वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या डॉक्टरांना बोगस डॉक्टर म्हणून संबोधण्यात येऊ लागले. त्यांच्यावर दंडात्मक आणि पोलीस कारवाई केली जात होती; त्यामुळेच आयुर्वेदिक डॉक्टर संघटनेचे डॉ. नवल मराठे, जय धन्वंतरी आयुर्वेदिक सेवा संस्थानचे डॉ. आर. बी. वाडकर (उस्मानाबाद) आणि डॉ. जयवंत शिंदे (जळगाव) यांनी हे कलम वगळण्याच्या कृतीला आव्हान दिले. ही दुरुस्ती घटनाविरोधी असल्याचा दावा याचिकाकर्त्यांनी केला आहे.

या याचिकेची प्राथमिक सुनावणी न्या. देशपांडे व न्या. कुकडे यांच्यासमोर झाली. पोलीस महासंचालक उस्मानाबाद आणि जळगावचे पोलीस अधीक्षक या प्रतिवादींना नोटिसा बजावण्यात आल्या. या संघटनेच्या सदस्यांविरुद्ध दंडात्मक अथवा सक्तीची कारवाई करू नये असे निर्देश न्यायालयाने दिले आहेत.

लोकसत्ता दि. १५/१२/०५


# वैद्यांना 'बोगस' डॉक्टर मानून कारवाई करण्यास मनाई

मुंबई, २६ नोव्हेंबर/प्रतिनिधी

प्रयाग, अलाहाबाद येथील 'हिंदी साहित्य सम्मेलन' या संस्थेच्या 'वैद्य विशारद' आणि 'आयुर्वेद रत्न' अशा पदव्या आणि अन्य राज्यांमध्ये केलेली नोंदणी याआधारे महाराष्ट्रात आयुर्वेदिक चिकित्सक म्हणून व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींना 'बनावट डॉक्टर' मानून त्यांच्याविरुद्ध कोणतीही सक्तीची कारवाई करण्यास सरकारला मनाई करणारा अंतरिम आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिला आहे.

अखिल भारतीय वैद्य असोसिएशन आणि हरिश्चंद्र जादव (मालाड), इंद्रबहादूर पटेल (कांदिवली) व समरबहादूर यादव (कांदिवली) या वैद्यांनी केलेली रिट याचिका सुनावणीसाठी दाखल करून घेताना न्या. श्रीमती रंजना देसाई व न्या. अभय ओक यांच्या खंडपीठाने हा अंतरिम आदेश दिला. या असोसिएशनचे सदस्य असलेल्या वैद्यांविरुद्ध 'बोगस डॉक्टर' म्हणून कोणतेही सक्तीचे उपाय योजण्यास त्याद्वारे मनाई करण्यात आली आहे. याआधी श्री धन्वंतरी राष्ट्रभाषा एवंम आयुर्वेद प्रचार समिती या संघटनेनेही याचिका करून असाच अंतरिम आदेश घेतला आहे.

'बनावट डॉक्टर' हुडकून काढून त्यांच्याविरुद्ध फौजदारी कारवाई करण्याचे आदेश पोलिसांना दिले गेले आहेत. 'महाराष्ट्र मेडिकल प्रॅक्टिशनर्स अ‍ॅक्ट'नुसार ज्या वैद्यकीय पदव्यांना मान्यता नाही व ज्यांची महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलकडे नोंदणीही झालेली नाही,



अशा वैद्यक व्यावसायिकांना 'बनावट डॉक्टर' मानून त्यांच्यावर कारवाई केली जात आहे. अर्जदार असोसिएशनच्या सदस्यांविरुद्धही पोलिसांनी अशीच कारवाई सुरू केली अथवा कारवाई होऊल या शक्यतेने ही याचिका केली गेली होती.

अर्जदारांचे वकील अ‍ॅड. राजू मोरे यांनी असा युक्तिवाद केला की, अर्जदार संघटनेचे सदस्य स्वतःला डॉक्टर म्हणवून घेत नाहीत व ते आयुर्वेदिक उपचार करतात. त्यांच्याकडे 'आयुर्वेद विशारद' व 'आयुर्वेद रत्न' अशा पदव्या आहेत. त्यांची इतर राज्यांमध्ये वैद्यक व्यावसायिक म्हणून रीतसर नोंदणी झालेली आहे. बिहार, राजस्थान, मध्य प्रदेश इत्यादी राज्यांमध्ये या पदव्यांना मान्यता आहे.

महाराष्ट्रात नोंदणी नसल्याच्या मुद्द्याचा परामर्श घेताना अ‍ॅड. मोरे यांनी १९७० च्या 'इंडियन मेडिसिन सेंट्रल कौन्सिल अ‍ॅक्ट'चा दाखला दिला. केंद्रीय कौन्सिल किंवा राज्य कौन्सिलकडे नोंदणी केलेले व मान्यताप्राप्त अर्हता धारण करणाऱ्या व्यक्ती देशाच्या कोणत्याही राज्यात आयुर्वेदिक वैद्य म्हणून व्यवसाय करण्याची मुभा या कायद्याने दिली आहे, असे ते म्हणाले. येथे 'राज्य कौन्सिल' असा उल्लेख आहे. याचा अर्थ कोणत्याही राज्यातील कौन्सिल असा घ्यायला हवा, कारण ज्या राज्यात व्यवसाय करायचा त्याच राज्याच्या कौन्सिलकडे नोंदणी असायला हवी, अशी स्पष्ट तरतूद नाही. शिवाय हा केंद्रीय कायदा असल्याने यातील तरतुदी राज्याने केलेल्या कायद्याहून श्रेष्ठ मानायला हव्या.

शिवाय 'वैद्य विशारद' आणि 'वैद्य रत्न' या पदव्यांना महाराष्ट्र सरकारने पदवीधर मतदारसंघातील मतदानासाठी मान्यताप्राप्त पदव्या म्हणून १९८५ पासून मान्यता दिली आहे, असेही त्यांनी निदर्शनास आणले.

मुंबई लोकसत्ता दि. २८/११/२००५

३३